Vol 3 Issue 4 Oct 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# GoldenResearch Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-4, Oct-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ - एक दृष्टिक्षेप

अनिल म. तिरकर
(सहाय्यक अधिव्याख्याता) श्रीमती ल.रा.तो.वाणिज्य महा.,अकोला.

***सारांश :***इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ हे ओ.बी.सी. बेरोजगारांना आधुनिक व पारंपारिक अशा दोन्ही व्यवसायासाठी वित्त पुरवठा कमी व्याजदराने करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असले तरी स्वंयरोजगाराला चालना देतांना ओ.बी.सी. च्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, त्याचा आर्थिक स्तर उंचावणे याची चर्चा करणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तृत शोध निबंधामध्ये महामंडळाचा इतिहास, उद्दिष्टे, व्यवस्थापकीय रचना, महामंडळाच्या विविध योजना, महामंडळाची यशोगाथा आणि व्यवसाय इत्यादी घटकांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे.

***प्रस्तवाना :***

देशाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने रोजगारांच्या मागणी आणि उपलब्धता यात मोठी दरी निर्माण झाली. महाराष्ट्र राज्यातील लोकांचे जीवनमान उंचावणे, समाज प्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास व्हावा. या हेतूने प्रत्येक जाती प्रवर्गांच्या लोकांना आपला आर्थिक विकास करवून घेता यावा या उद्देशाने प्रत्येक जात प्रवर्ग निहाय वेगवेगळया महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 'शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले. अनुसूचित जाती मधील प्रवर्गाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 'महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ', मातंग समाजासाठी 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' व चांभार समाजासाठी 'संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले. तर भटक्या विमुक्त जाती प्रवर्ग या संवर्गातील लोकांचा विकास करण्यासाठी अनुक्रमे 'वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ' आणि 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ' स्थापन करण्यात आली तसेच इतर मागस प्रवर्गातील लोकांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले. खुल्या प्रवर्गातील काही अल्पसंख्याक जातीचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने नव्यानेच 'मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले आहे. प्रत्येक जात प्रवर्गातील सर्वच लोकांचे वार्षिक उत्पन्न हे त्यांच्या प्राथमिक गरजा भागवू शकतील एवढे पुरेसे नसते. त्यांना स्वंयरोजगाराकडे, सेवा क्षेत्राकडे वळवून त्यांची अर्थार्जन क्षमता वाढवावी या हेतूने व्यावसायिक प्रशिक्षण देणे, व्यवसाय उभारण्यासाठी अर्थ सहाय्य देणे व विविध सवलती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध महामंडळाची जात प्रवर्ग निहाय निर्मिती शासनाने केली आहे.

महामंडळाची स्थापना :

इतर मागासवर्गीयांचे सर्वांगीण कल्याण व विकासासाठी विविध योजना राबविण्याच्या दृष्टिने 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले इतर मागासवर्ग या प्रवर्गात केंद्र शासनाच्या यादी नुसार विविध धर्मातील मागास जाती व पोट जाती म्हणून '३४६' जाती-पोटजाती समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक जाती पोटजाती मधील जे लोक प्रगत उत्पन्न गटात समाविष्ट होत नाहीत, अश्या व्यक्तींना कृषी व संलग्न व्यवसाय, वाहतूक क्षेत्राशी संबंधीत व्यवसाय, लघु उद्योग, सेवाउद्योग क्षेत्रातील व्यवसाय उभारणी करण्यासाठी शासन स्तरावरून ज्या सोयी सुविधा पुरविल्या जातात. या सोयी सुविधा लोकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशानेच 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची' स्थापना करण्यात आली.

घटनेच्या कलम ३७१ नुसार विदर्भाच्या विकासाच्या दृष्टिने 'विदर्भ वैधानिक विकास महामंडळाची' स्थापना करण्यात आली. याच कलमा अंतर्गत राज्यातील संपूर्ण ओबीसी नागरिक, बेरोजगार, विद्यार्थी यांच्या विकासाच्या दृष्टिने व्यक्ती, कुंटूब व समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वंयरोजगाराला चालना देण्याच्या उद्देशाने शासनाने सामाजिक न्याय विभागांतर्गत इतर मागास वर्गीयांसाठी 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि.' ची स्थापना केली आहे. कंपनी कायद्याखाली या महामंडळाची दि. २३ एप्रिल १९९९ रोजी सरकारी कंपनी म्हणून नोंदणी करण्यात आली. इतर मागासवर्गीयांचे सर्वांगीण कल्याण व विकासासाठी विविध योजना राबविण्याच्या दृष्टिने वित्त पुरवठा करणे हे या महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच स्वंयरोजगाराला प्रोत्साहन चालना देवून त्यांची आर्थिक स्थिती उंचावणे, त्यांच्या उत्पादन निर्मितीला बाजारपेठ उपलब्ध करून देणे हे देखील महामंडळाच्या उद्दिष्टांमध्ये अंर्तभुत आहे.

महामंडळाचा इतिहास :

इतर मागासवर्गीय प्रवर्ग या घटकातील ज्या व्यक्तींचे उत्पन्न प्रगत गटात मोडत नाही अशा व्यक्तींना त्यांचा सर्वांगीण विकास साधता यावा तसेच त्यांच्या उत्पन्नाच्या पुर्वीच्या साधनांचा विकास व्हावा किंवा नविन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नव्याने उत्पन्नाच्या साधनांची निर्मिती करावी या मुख्य हेतूनेच 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची' २३ एप्रिल १९९९ साली स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे रू. ५० कोटी रूपये अधिकृत भाग भांडवल व कर्ज योजनांसाठी रू. १२५ कोटी रूपये शासनाने हमी म्हणून मंजूर केले होते. हा संपूर्ण निधी राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च व्हावा या उद्देशाने मुख्य कार्यालय, मुंबई येथे स्थापन केले असून प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी या महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यात आले. महामंडळात बीजभांडवल योजना, सुक्ष्म पतपुरवठा योजना, महिला समृध्दी योजना, स्वर्णिमा योजना, स्वंयसक्षम कर्ज योजना, मार्जिन मनी योजना, शैक्षणिक कर्ज योजनांचा समावेश करण्यात आला. रु. ५० हजारांपासून पाच लाख पर्यंतचे कर्ज या महामंडळाच्या माध्यमातून उपलब्ध होते. यापूर्वी बापूसाहेब भुजबळ या महामंडळाचे अध्यक्ष होते. त्यानंतर नाशिकचे डॉ. कैलास कमोद यांच्याकडे सहा वर्षांपूर्वी या महामंडळाची सुत्रे देण्यात आली. उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचे खंदे समर्थक म्हणून परिचित असलेल्या डॉ. कमोद यांच्याकडे या महामंडळाची जबाबदारी सोपविली गेल्यानंतर नाशिक विभागातील ओबीसींच्या अपेक्षा उंचावल्या. अनेक गरजू आपल्या आर्थिक उन्नतीचे स्वप्न पाहू लागले डॉ. कमोद यांच्या चार वर्षाच्या कारकीर्दीत चाळीस कोटींच्या जवळपास रक्कम राज्यभरात वाटप झाली. त्यानंतर केंद्र शासनाने कर्ज माफीचा निर्णय घेतला. या महामंडळाकडून कर्ज घेतलेल्या कर्जदारांची ५० कोटींची रक्कम माफ झाली. ज्यांना या कर्ज माफीचा लाभ झाला त्यांनी केंद्र शासनाला दुवा दिली. काही दिवस सर्वांनी खुशीत गांजरे खाल्ली.

महामंडळाची उद्दिष्टे :

१.राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याण व विकासासाठी कृषी विकास, पणन, संस्करण, कृषी उत्पादनाचा पुरवठा आणि साठवण, लघुउद्योग, इमारत बांधणी, परिवहन या कार्यक्रमांची आणि अन्य व्यवसाय (वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्रीय यासारखे) व्यापार किंवा उद्योग यांची योजना आखणे, त्यांना चालना देणे, त्यांना सहाय्य करणे, सल्ला देणे, मदत करणे, वित्त पुरवठा करणे, त्यांचे संरक्षण करणे.

२.इतर मागासवर्गीयांची आर्थिक स्थिती, उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन आणि पणन यांचा विकास करणे, त्यात सुधारणा करणे, त्यांचे कामकाज, व्यवसाय, व्यापार किंवा उद्योग सुरू करण्यासाठी त्यांना भांडवल, पतसाधने, साधनसामुग्री आणि तांत्रिक व व्यवस्थापकीय साधने पुरविणे.

३.इतर मागासवर्गीयांसाठी कृषी उत्पादने, वस्तू, साहित्य आणि सामुग्री यांची बनावट, निर्मिती, जुळवणी व पुरवठा यासाठी विविध क्षेत्रातील व्यक्ति किंवा संघटना बरोबर करार करणे आणि त्यांच्याकडील मागण्या हाती घेणे आणि त्या इतर मागासवर्गीय लोकांना उपकंत्राटाने देऊन किंवा त्याबाबत त्यांच्याकडे कामाच्या मागण्या सुपुर्द करून त्यांचे कडून कामे यथायोग्य रितीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक वाटतील अशा सेवा देणे.

४.राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी योजना सुरू करणे आणि त्यांना चालना देणे, या प्रयोजनासाठी अहवाल आणि निलप्रती (ब्ल्यू प्रिंटस) तयार करणे / तयार करून घेणे आणि आकडेवारी व इतर माहिती गोळा करणे.

५.वरील कामे प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कंपन्या, संघ, सल्लागार मंडळे किंवा योग्य त्या संस्था प्रवर्तित करणे आणि स्थापन करणे.

महामंडळाची व्यवस्थापकीय रचना :




महामंडळाच्या विविध योजना :

१. बीज भांडवल योजना :

महामंडळ ही योजना राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये जिल्हा अग्रणी बॅंकांच्या माध्यमातून राबविते. सदर योजनेमध्ये महामंडळाचा सहभाग २० टक्के, लाभार्थीचा सहभाग ५ टक्के असून व बॅंकेचा सहभाग ७५ टक्के असतो. या योजनेमध्ये महत्तम प्रकल्प मर्यादा रू ५.०० लाख आहे. व्याजदर ६ टक्के असून परतफेडीचा कालावधी ५ वर्षाचा असतो.

२. मुदती कर्ज योजना :

या योजनेअंतर्गत रू. ३.०० लाख प्रकल्प मर्यादे पर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो. यामध्ये राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ८५ टक्के, राज्य महामंडळाचा सहभाग १० टक्के व लाभार्थीचा सहभाग ५ टक्के असतो. व्याजाचा दर ६ टक्के असून परतफेड ५ वर्षात करावयाची असते.

३. मार्जिन मनी योजना :

या योजनेअंतर्गत रू. ५.०० लाख प्रकल्प मर्यादेपर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो. यामध्ये राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ४० टक्के, राज्य महामंडळाचा सहभाग ५ टक्के, संबंधीत बॅंकेचा सहभाग ५० टक्के व लाभार्थीचा सहभाग ५ टक्के असतो. महामंडळाच्या सहभागावर व्याजाचा दर ६ टक्के असून परतफेड ५ वर्षात करावयाची असते.

४. महिलांसाठी स्वर्णिमा योजना :

रू. ७५,०००/- या प्रकल्प किंमती पर्यंत महिलांसाठी ५ टक्के व्याजाने कर्ज मंजूर करण्यात येते. त्यामध्ये महिलांना सहभाग भरण्याची गरज नसते व परतफेडीचा कालावधी ७ वर्षाचा आहे.

५. सुक्ष्म पतपुरवठा योजना :

या योजनेअंतर्गत अशासकीय संस्था मार्फत स्वंयसहाय्यता बचत गटांना कर्ज पुरवठा करण्यासाठी संस्थेला रू. ५.०० लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. संस्थेने गटाच्या कमीत कमी २० सदस्यांना जास्तीत जास्त रू. ३०,०००/- रू. या मर्यादेपर्यंत कर्ज मंजूर करावयाचे असते. या योजने अंतर्गत संस्थेला ५ टक्के दराने कर्ज मंजूर करण्यात येते. संस्था हे लाभार्थीला ९ टक्के दराने कर्ज मंजूर करण्यात येते. कर्ज परतफेडीचा कालावधी ४ वर्षाचा असतो.

६. महिला समृध्दी योजना :

या योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील महिलांना सरळ अथवा स्वंयसहाय्यता बचत एस.एच.जी. गटाच्या माध्यमातून रू. ५ लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. एका बचत गटामधील जास्तीत जास्त २० महिलांना जास्तीत-जास्त प्रत्येकी रू. ३०,०००/- इतके कर्ज ४ टक्के व्याजदराने देण्यात येते. कर्ज परतफेडीचा कालावधी ४ वर्षाचा असतो.

७. शैक्षणिक कर्ज योजना :

या योजनेअंतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी जास्तीत जास्त रू. २,५०,०००/- व संपूर्ण अभ्यासक्रमासाठी रू. १० लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. व्याजाचा दर ४ टक्के असून परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यावर ५ वर्षात करावयाची असते.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची यशोगाथा :

१.महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रू. ५० कोटी वरून रु २५० कोटी पर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर. मान्यता शासनाचे विचाराधीन.

२.व्यवस्थापकीय अनुदानात दि. ३१ मार्च २०१२ पर्यंत एकुण रू. ५०.६५ कोटी निधी शासनाने उपलब्ध करून दिलेला आहे.

३.बीजभांडवल कर्ज योजनेत कर्ज मंजूरी व वितरणाचे रू. ५ लक्ष पर्यंतच्या प्रकल्प किंमतीच्या प्रस्तावामध्ये जिल्हा व्यवस्थापकांना अधिकार आजतागायत ८४६७ लाभार्थीनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

४.सुक्ष्म पतपुरवठा योजनेअंतर्गत स्वंयसेवी संस्थांच्या (एन.जी.ओ.) माध्यमातून स्वंयसहाय्यता बचत गटातील (एस.एच.जी.) ३८३५ महिलांना स्वंयरोजगारासाठी रू. ३.५५ कोटी कर्जाचे वितरण.

५.शैक्षणिक कर्ज योजने अंतर्गत उच्च शिक्षणाकरीता कर्ज उपलब्ध आजतागायत सदर योजनेअंतर्गत ३१९४ विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता रू. ८.३१ कोटी कर्जाचे वितरण.

६.महामंडळाच्या स्थापनेपासून गेल्या ५ वर्षामध्ये योजनांसाठी शासनाने दि. ३१ मार्च २०१२ पर्यंत रू. १०७.४५ कोटी भागभांडवल उपलब्ध करून दिले आहे.

७.राष्ट्रीय महामंडळाकडून कर्ज घेण्यासाठी शासनाकडून रू. ५०.०० कोटी रकमेची ठोक वाढीव हमी प्राप्त आहे. या व्यतिरीक्त रू. ७०.०० कोटी वाढीव हमीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन.

११.लाभार्थींकरिता मिटकॉन, पुणे व एम.सी.ई.डी. औरंगाबाद व सिबार्ट, सिंधुदुर्ग या प्रशिक्षण संस्था व्दारा आजपर्यंत उद्योजकता विकास प्रकल्प अनुषंगिक ४५०१ लाभार्थींना प्रशिक्षण.

महाराष्ट्र इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची यशस्वी वाटचाल :




वरील आलेखामध्ये महाराष्ट्र शासनाकडून वर्षनिहाय महामंडळाला किती भागभांडवल दिलेले आहे. याचे वर विवरण दिलेले आहे. सुरूवातीला १९९८-१९९९ महामंडळाचे भागभांडवल रू. ५०. ०० लाख एवढे होते. ते दर वर्षी वाढत जावून २०११-२०१२ मध्ये महामंडळाचे भागभांडवल रू. ४४.३७ कोटी एवढे मोठे वाढलेले आहे. यावरून महामंडळाचा व्याप कसा दिवसेंदिवस वाढत आहे. हे आपल्याला आलेखावरून दिसेल.

महामंडळाच्या योजनेअंतर्गत सुरू करता येण्यासारखे व्यवसाय :

कृषी व संलग्न व्यवसाय

| | | | |
|---|---|---|---|
| फुलझाडांची लागवड | शेळी पालन | रेशिम उद्योग | आळंबी उत्पादन |
| ट्रॅक्टर-ट्रॉली | कुक्कुट पालन | दुग्ध व्यवसाय | मत्स्य व्यवसाय |
| मळणी यंत्र | फळबाग | कृषी क्लिनीक | विहिरीची खोली वाढविणे |

वाहतुक क्षेत्राशी संबंधीत व्यवसाय

| | | | |
|---|---|---|---|
| प्राण्यांचा वापर केलेली गाडी | बैलगाडी | सायकल रिक्षा | ऑटो रिक्षा |
| टायरच्या चाकांची बैलगाडी | मारूती व्हॅन | मिनी बस | मिनी ट्रक |
| जीप / टुरिस्ट टॅक्सी | दळणवळण व्यापार संस्था | | |

तांत्रिक स्वरूपाचे व्यवसाय

| | | | |
|---|---|---|---|
| टायर दुरूस्तीचे दुकान | वाहन दुरूस्तीचे दुकान | पी.यु.सी. सेंटर(फिरते) | पंपसेट विक्री |
| मोटारसायकल दुरूस्ती सेंटर | सायकल दुरूस्तीचे दुकान | वाहन सर्व्हिसिंग केंद्र | टायपिंग केंद्र |
| विद्युत मोटार वायडिंग | विद्युत वर्क शॉप | डिश ॲंटेना | ग्लास व फोटोफ्रेम सेंटर |
| बॅटरी चार्जिंग / दुरूस्ती शॉप | वास्तू विशारद व्यवसाय | कुलूप बनविणे व रिपेअरिंग | |
| टि.व्हि., रेडिओ रिपेअरिंग | वातानुकुलित यंत्र विक्री / दुरूस्ती | | |

पारंपारिक व्यवसाय

| | | | |
|---|---|---|---|
| सिमेंट जाळी उत्पादन | ऑईस फॅक्टरी | मिनी ऑईल कारखाना | घरगुती फरसाण उद्योग |
| हॉटेल धाबा | केबल व्यवसाय | मसाला उद्योग (पॅकिंग) | आईसक्रिम / ज्यूस सेंटर |
| पेप्सी कारखाना | खडू बनविणे | छोटा पेन कारखाना | कंगवा / ब्रश उत्पादन |
| इमिटेशन ज्वेलरी व्यवसाय | बादल्यांचे उत्पादन | पिठाची गिरणी | लोखंडी सामान / रंगकाम |
| रंगकाम व नक्षीकाम युनिट | खताचे दुकान | चहापत्ती सेंटर | फळ / भाजीपाला विक्री दुकान |
| लोखंडी बादल्या बनविणे | जनरल स्टोअर्स | हिरे कटाई | रेडिमेड कपडे बनविणे |
| किराणा दुकान | पारंपारिक वस्तू | चामडयाच्या वस्तू | एम.एस. ग्रील, गेट बनविणे |
| हार्डवेअर व पेन्ट शॉप | हवाई चप्पल उत्पादन | खडू बनविणे | मटण शॉप |
| व्यापारी संस्था / अडत दुकान | छापखाना / स्क्रिन प्रिंटींग | स्प्रे पेंटिंग | लाकडी वस्तू बनविणे |
| विट भट्टी | कुंभारकाम | तेल घाणा | पानबिडी टपरी |
| किटकनाशके विक्री | टेलरिंग | कुलर उत्पादन | ब्लॅंकेट तयार करणे |
| स्टेशनरी / पुस्तकाचे दुकान | पेटया बनविणे | लाकुड वखार | कुंकू उत्पादन |
| बांधकामासाठी लाकूडकाम | मसाला उद्योग | कापड दुकान | बटाटा वेफर्स बनविणे |
| डिटीपी/टायपींग इन्स्टिटयूट | गृहोपयोगी वस्तू बनविणे | मेणबत्ती बनविणे | माशांची जाळी बनविणे |
| झेरॉक्स / लॅमिनेशन सेंटर | कुरमुरे पोहे बनविणे | टायर रिमोल्डींग युनिट | गादी कारखाना |
| धुप चंदन अगरबत्ती उत्पादन | वडापाव गाडी | बारदान व्यवसाय | स्टिल, पितळी नेमप्लेट बनविणे |
| पापड उद्योग | पीन, टाचणी कारखाना | मॅचिंग सेंटर | कायदेशीर सल्लागार केंद्र |
| ब्युटी पार्लर | बी-बियाणे विक्री | टेंट (मंडप)सप्लायर | मिठाई दुकान |
| स्टील भांडी दुकान | सुतार काम | धोबी काम | एस.टी.डी., पी.सी.ओ. बुथ |
| टेलरिंग मशिन शॉप | कुंभार काम | हस्तकला | फळ-भाजीपाला विक्री दुकान |
| लोहार काम | लाकुड कोरीव काम | तयार कपडे | हातमाग कापड तयार करणे |
| दागिने बनविणे | बांगडीचे दुकान | केश कर्तनालय | सुती कापड तयार करणे |
| ब्लॅंकेट तयार करणे | मासे खरेदी व विक्री | | |

या व्यसायांव्यतिरीक्त नविन व्यवसायासाठी कर्ज पुरवठा हवा असल्यास त्याचा प्रकल्प अहवाल जिल्हा कार्यालया मार्फत सादर केल्यास त्याची छाननी करून योग्य ती कार्यवाही महामंडळा मार्फत केली जाते.

निष्कर्ष :

भारत देशामध्ये इतर मागासवर्ग जातींची संख्या फार मोठया प्रमाणावर आहे. महाराष्ट्र राज्यातही एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या प्रमाणात ओबीसी आहेत. सुतारकाम, माळीकाम, वस्त्र विणणे अशा पारंपारिक व्यवसाय त्यांच्यापासून हिरावून घेतले जात आहेत. ट्रक्टरच्या उपलब्धेनंतर बैलगाडी आणि नांगर बनविणारा ग्रामीण सुतार बेराजगार होऊ लागला. याप्रमाणे इतरही पारंपारिक व्यवसाय धोक्यात येऊ लागले. एक काळ असा होता की, स्वंयरोजगार हा युवकांपुढे शेवटचा पर्याय होता. परंतू जागतिककरणाच्या बदलत्या समीकरणानुसार तरूणांना स्वंयरोजगार हा एकच पर्याय शिल्लक आहे हे ध्यानात घेऊन त्यांनी काळाचे आव्हान स्विकारायला हवे. हे आव्हान जर महामंडळाच्या लाभार्थींनी स्विकारले तर लाभार्थी व महामंडळ दोघेही यशस्वी होतील व समाजाची आर्थिकस्थिती सुधारण्यास मोलाचा हातभार लावतील.

संदर्भसूची :

१.बोधनकर डॉ. सुधीर, प्रा. अलोणी विवेक, जाने. २००७, ‘सामाजिक संशोधन पध्दती’, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२.देशमुख डॉ. प्रभाकर, जुलै १९८८, ‘आर्थिक धोरण आणि नियोजन’, पिंपळोपुरे ॲन्ड कं. पब्लिशर्अ, नागपूर.
३.नरभवर रविंद्र, जाने. २००२, ‘संपूर्ण शासकीय योजना’, फाळके पॅपिलॉन पब्लिसिंग हाऊस, पूणे.
४.सूर्यवंशी बापू, जुन २००५, ‘शासनाच्या विविध कर्ज अनुदान योजना’, व्ही.एस.प्रिंटर्स बोरीवली पूर्व, मुंबई.
५.‘उद्योजक मासिक’, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद.
६.‘लोकराज्य मासिक’, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
७.महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांचे उपलब्ध
१.शासकीय अहवाल
२.माहिती पुस्तिका
८.WWW.MSOBCFDC.COM

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net